## दत्तक घेतल्यानंतरचा पाठपुरावा –

तुमचे मुल आणि तुम्ही एकत्र राहू लागता. तुमच्या बालकाच्या स्विकाराची, आपलेपणाची भावना निर्माण होणे आणि नवे नाते अंगवळणी पडण्यास समाजकार्यकर्ती मार्गदर्शन करते. यासाठी कार्यकर्ती वेळोवेळी आपल्या भेटीला येईल. तुमच्या काही समस्या असल्यास या भेटीत सोडविता येतील. हा पाठपुरावा हिंदु दत्तक प्रकरणी ३ वर्षासाठी तर पालक अधिनियमात ५ वर्ष करावा लागतो.

## खर्च कितो येतो ?

बालकल्याण संस्था ना नफा ना तोटा तत्वावर चालतात. तथापी या संपूर्ण प्रक्रियेत काही खर्च हा लागतोच. या खर्चामध्ये संस्थेचा सेवा शुल्क, मुलांच्या संगोपनाचा खर्च, वकीलांची व छाननी सेवा संस्थेची फी यांचा समावेश असतो.

## आता थोडे आमच्या संस्थे संबंधी –

आमची संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदणी बद्ध झालेली संस्था आहे. दत्तकविधानाच्या कार्याचा सर्वतोपरी प्रचार आणि प्रसार करण्याचा मुख्य उद्देशातून इ.स. १९९८ मध्ये संस्था स्थापना झाली. संस्था खालील प्रकल्प चालवते.

## बाल संगोपन गृह (चाईल्ड केयर युनिट)

१९९८ पासुन संस्थेने बाल संगोपन गृह सुरु केले. अनाथ, निराधार बालकांचे संगोपन केले जाते. त्यांची सर्वतोपरी काळजी घेतली जाते आणि दत्तक विधानाद्वारे त्यांचे

कुटूंबात पुनर्वसन केले जाते. याचसाठी संस्थेला स्त्रिया व मुले अनुज्ञप्ती नियमांतर्गत अनुज्ञप्ती प्राप्त झाली आहे.

## प्रसार व प्रचार कार्य –

दत्तक विधानाची संकल्पना समाजाने स्विकारावी आणि जास्तीत जास्त मुलांना कुटूंब मिळावे म्हणून प्रचार व प्रसाराने कार्य केले जाते. त्यासाठी समाजसेवी गट, महिला मंडळे, स्त्रीरोग तज्ञ, बाल रोग तज्ञ इत्यादिसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. संस्थेने विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात हे कार्य चालू केले आहे. यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग केला जातो. याशिवाय दत्तकेच्छुक पालक व दत्तक पालक यांच्यासाठी अनुभवांची देवघेव होण्याच्या हेतूने सभा, दत्तक विधानाशी संबंधित व्यावसायिक गटांसाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, संमेलन यांचे आयोजन केले जाते.

## कुमारी माता सल्ला केंद्र –

कुमारी मातांची समस्या हा एक मोठा प्रश्न समाजासमोर उद्‌भवला आहे. बहूतांश कुमारी माता ह्या गरीब कुटूंबातील असतात. या मुलींवर आलेल्या आपत्तीवर मात करण्याचा संस्था प्रयत्न करते.

त्यांना मानसिक आधार देऊन सल्ला व मार्गदर्शन केले जाते. शक्य झाल्यास त्यांना होणारे मुल त्यांनीच स्विकारावे म्हणून प्रयत्न केला जातो. तसे न झाल्यास होणाऱ्या अपत्त्याला संस्था आश्रय देते.